# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०२/०३/२०१८**

## १) जबरी चोरी :-

**भाग्यनगर :-** दिनांक २८.०२.२०१८ रोजीचे १६.०० वा. चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी व्यंकटेश्वरानगर देवाशिष निवास नांदेड यातील फिर्यादी व तिची मुलगी टि.व्ही. पाहत असताना कोणीतरी अज्ञात चोरटा मागच्या दाराने घरात प्रवेश करुन फिर्यादीचे तोंड दाबले व कटरचा धाक दाखवुन कुणीही अवाज करु नका, बोल्ला तर खतम करीण अशी धमकी दिवुन फिर्यादीचे गळयातील तीन तोळयाचे सोन्याचे गंठण अंदाजे किंमत ९०,०००/- रुपयाचा माल जबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी सौ. शिल्पा पंढरीनाथ पद्मावार वय ३८ व्यवसाय घरकाम रा. व्यंकटेश्वरानगर देवाशिष निवास नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरनं ४९/२०१८ कलम ३९२, ४५२ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/ खर्जुले मो.क्रं. ८२०८०७२०६५** हे करीत आहेत.

## २) विवाहितेचा छळ :-

**मुखेड :-** सन २०१४ ते दि. ०१.०३.२०१८ दरम्यान ब्रम्हसिंगनगर नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी संगणमत करुन फिर्यादी महिलेस घरबांधणीसाठी माहेरहुन २,००,०००/-रुपये घेवुन ये म्हणुन मारहाण करुन फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ केला व घराबाहेर हाकलुन दिले वगैर वरुन **३१ वर्षीय असलेल्या महिला फिर्यादी व्यवसाय घरकाम रा. ब्रम्हसिंगनगर नांदेड ह. मु. शिवाजीनगर मुखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो. स्टे. मुखेड** गुरनं. ५४/२०१८ कलम ४९८(अ), ३२३,३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१९७२ मोरे ,मो.क्र. ९१५८७६३६०** हे करीत आहेत.

## ३) खंडणीची मागणी :-

**वजिराबाद** :- दि. २४.०२.२०१७ चे रोजी १९.३० वा. ते २५.०२.२०१८ रोजी चे ०४.०० वा. चे दरम्यान तांडाबार समोरुन अंबेडकर पुतळा नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन, कट रचुन फिर्यादीस आरोपी क्रमांक १ च्या पत्नीस का बोलतोस म्हणुन पिस्तोलाचा धाक दाखवुन गाडीत बसवुन शिवीगाळ करुन लाखडी लाठीने व इतर कशानेतरी जबर मारहाण करुन फिर्यादीस ५,००,०००/-रुपयाची खंडणी मागीतली नांदेड ते परभणी दरम्यान प्रवासात गाडीमध्ये मारहाण केली वगैरे **फिर्यादी अक्षय प्रदिप लोखंडे वय २५ वर्षे व्यवसाय शिक्षण रा. सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरन ३५/२०१८ कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९, ३८५, ३६४(अ), ३२७, १२०(ब), भादंवि सह ३/२५ भा.ह. का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/व्ही. एच. हराळे मो. क्र. ९८२३२३४१४३** हे करीत आहेत.

## ४) सदोष मणुष्य वध:-

**कंधार :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे ०७.०० वा. चे सुमारास, विधी माहाविद्यालयाचे पाठीमागे ता. कंधार जि. नांदेड यातील आरोपीतांनी संगणमत करुन पैसे देणे घेणेच्या कारणावरुन वाद होवुन फिर्यादीचे वडीलांना हार्टअॅटॅकची बिमारी आहे हे माहिती असताना त्यांना आरोपीतांनी छातीत, पोटात, हाताचे खोपऱ्याने मारहाण करुन जबरदस्तीने मोटार सायकलवर बसुन घेऊन जात असताना त्रास होत असल्याने त्यास स.द. कंधार येथे शरीक केले असता फिर्यादीचे वडील **मयत नामे रावसाहेब दत्ता दासरे वय ५० वर्षे रा. कंधारेवाडी ता. कंधार** यांचे मरणास कारणीभुत झाले. वगैरे **फिर्यादी संभाजी रावसाहेब दासरे वय २४ वर्षे रा. कंधारेवाडी ता. कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. कंधार** गुरन ४९/२०१८ कलम ३०४, ३२३, ५०६, ३४, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि /नांदगांवकर मो.नं. ९०११०८८४१९** हे करीत आहेत.

## ५) जिवनावश्यक वस्तु अधिनियम :-

**धर्माबाद :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी १२.५० वा. चे सुमारास, सुभाषनगर येथील दारुउल्लूमचे पाटीमागे बाळापुर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगनमत करुन आपले ताब्यातील बिना परवाना बेकायदेशिर रित्या जिवनावश्यक वस्तु कायदयान्वये प्रतिबंधीत ९४५ ली. रॉकेल कि. अ. ४२,५२५/-रुपये व एक अॅटो क्रमांक ए.पी.१/-७३६७ कि.अ. ८०,०००/-रुपये असे एकुण १,२२,५२५/-रुपयाचा माल काळया बाजारात चोरटी विक्री करताना मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि/ मधुकर गोविंदराव वाघमारे ने. पो. स्टे. धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पो. स्टे. धर्माबाद** गुरनं ५१/२०१८ कलम ३, ७ जिवनावश्यक वस्तु कायद्यान्वये गुन्हा दाखल असून **तपास पो.नि. /जायभाये मो.नं. ९४२३१४०९३०** हे करीत आहेत.

## ६) मिलन कल्याण नावाचा मटका जुगार:-

**भाग्यनगर :-** दिनांक २८.०२.२०१८ रोजी चे १५.५५ वा. चे सुमारास यादव कॉम्पलेक्स वर्कशॉप कॉर्नर नांदेड यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी ३१,४७५/- रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि/ चितरंजन गॅनोबा ढेमकेवाढ ने . पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन. ४८/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री सी.ए. कदम मो.क्र. ७०८३५५२२३३** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररीत्या देशी दारू बाळगुन मिळुन आला :-

**अ) कुंटूर :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे १९.०५ वा. चे सुमारास मौजे कुंटूरफाटा निसर्ग हॉटेलच्या पाटीमागे ता. नायगाव जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल. च्या ४८ बॉटल किंमती २,४९६/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगुन मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोउपनि/ शेख अब्दुलबारी महमद शरीफ पो. स्टे. कुंटूर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन २४/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५८५ गिते मो.क्र. ९४०३५१९१२८** हे करीत आहेत.

**ब) भाग्यनगर :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे १७.२५ वा. चे सुमारास सुमेदनगर पाटीजवळ कॅनॉलरोड नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल. च्या ९६ बॉटल किंमती ४,९९२/-रुपयाचा माल चोरटी वाहतूक करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगुन मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोउपनि/ चितरंजन गॅनोबा ढेमकेवाढ ने . पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन ५०/२०१८ कलम ६५ (ई), ८३, महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/२०१४ एस. डी. शिरसाठ मो.क्र. ०२४६२२६१३६४** हे करीत आहेत.

**क) भाग्यनगर :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे १९.१६ वा. चे सुमारास बजाज रेसीडेंन्सी मिलर प्राईड रोड नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल. च्या ६० बॉटल किंमती ३,१२०/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्यो उद्देशाने ताब्यात बाळगुन मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोउपनि/ गणेश आशोक गोटके ने . पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन ५१/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/३३४ व्हि. एच. रोकडे मो.क्र. ०२४६२२६१३६४** हे करीत आहेत.

## ८) बेकायदेशिररीत्या विदेशी दारू बाळगुन मिळुन आला :-

**शिवाजीनगर:-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे १५.४० वा. चे सुमारास दातीवाला पेट्रोलपंपासमोर खोब्रागडेनगर नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारु १८० एम.एल. च्या २२ बॉटल किंमती २,७५०/-रुपयाचा व ९० एम. एल. च्या ३० बॉटल किंमत २,११०/-रुपयाची असा एकुण ४,८६०/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगुन मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१६७५ मारोती नारायण तेलंगे पो. स्टे. शिवाजीनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरन २४/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२८०३ चाटे मो.क्र. ९६७३१११५८८** हे करीत आहेत.

## ९) बेकायदेशिररीत्या गावठी दारु बाळगुन मिळुन आला :-

**अ) मांडवी :-** दिनांक ०१/०३/२०१८ रोजी चे ०९.५० वा. चे सुमारास खंबाळा ता. किनवट जि. नांदेड येथे यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या २० लिटर हातभट्टीची गावठी दारु अंदाजे किंमत २,००० /- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१६७१ वसंत चव्हाण** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मांडवी** गुरन १२/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १६७१ वसंत चव्हाण मो.क्र. ९८२२३४३७५६** हे करीत आहेत.

**ब) मांडवी :-** दिनांक ०१/०३/२०१८ रोजी चे १०.१५ वा. चे सुमारास आरोपीचे घरी खंबाळा ता. किनवट जि. नांदेड येथे यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या २५ लिटर हातभट्टीची गावठी दारु अंदाजे किंमत २,५०० /- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१६७१ वसंत चव्हाण** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मांडवी** गुरन १३/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १६७१ वसंत चव्हाण मो.क्र. ९८२२३४३७५६** हे करीत आहेत.

## १०) पाण्यात बुडून मृत्यु :-

**धर्माबाद :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे ०७.०० ते ०७.३० वा. चे सुमारास मौजे राजापुर शिवार जि. नांदेड येथे यातील **मयत नामे शिवानंद लक्ष्मण शिवशेटे वय २३ वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी रा. इळेगाव थळी ता. धर्माबाद जि. नांदेड** हा विहीरीत पोहायला गेला असता पाण्यात बुडूण मरण पावल. वगैरे **खबर देणार माधवराव हरिकन कोटगाळे वय ५५ वर्षे व्यवसाय शेती रा. मौजे राजापुर ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. धर्माबाद** आ.मृ. ०४/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोनि/ जायभाये मो.क्र. ८९७५४९८५९९** हे करीत आहेत.

## ११) शॉक लागुन मृत्यु :-

**उमरी :-** दिनांक ०१.०३.२०१८ रोजी चे ०८.०० वा. चे सुमारास, चांभार गल्ली उमरी जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे संतोष किशन राठोड वय २७ वर्षे रा. गणेशनगर उमरी जि. नांदेड** हा जैयस्वाल यांचे घरी इलेक्ट्रीक मोटारीचे काम करण्यास गेला असता त्यास शॉक लागला उपचार कामी सरकारी दवाखाना उमरी येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान तो मरण पावला वगैरे **फिर्यादी किशन हरी राठोड वय ५० वर्षे व्यवसाय मिस्त्री रा. गणेशनगर उमरी जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पो.स्टे. उमरी** आ.मृ. ११/२०१८ कलम १७४ सि.आर.पी.सी. प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १५९६ नागनाथ पोशट्टी मुंडलोड ,मो.क्र. ९९२३४१७५९६** हे करीत आहेत.


**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड

फोन नंबर ०२४६२-२४४४७४

दिनांक ०२/०३/२०१८

# प्रेस नोट

## (शिवजयंती बंदोबस्त)

दिनांक ०४/०३/२०१८ रोजी शिवजयंती बंदोबस्त असल्याने शहराच्या विविध भागातून शिवजयंती च्या मिरवणूका व शोभा यात्रा निघणार असून मुख्य रस्त्यावर मिरवणूकांच्या व वाहनांच्या गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये या कारणासाठी वाहतुक व्यवस्थेत एक दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात बदल करणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे नांदेड शहरातील पर्यायी मार्गावरील वाहतुकीस वळण देण्यात यावे व तसे आदेशित करण्यात यावे जेणे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही.

१. जुनामोंढा, देनाबँक, महाविर चौक, तरोडेकर मार्केट, वजिराबाद चौक, कलामंदिर, शिवाजीनगर ते आय.टी.आय.चौका पर्यन्त जाण्या-येण्यास बंद.

२. राजकॉर्नरकडून आय.टी.आय.कडे येण्यासाठी राजकॉर्नर, वर्कशॉप टी पॉईन्ट, श्रीनगर ते आयटीआय पर्यन्त डावी बाजू बंद.

३. राजकॉर्नर ते तरोडा नाक्याकडे जाण्यासाठी डावी बाजू बंद.

४. बर्की चौक ते जुनामोंढाकडे जाण्या येण्यासाठी बंद.

५. सिडको/हडको जुनामोंढयाकडे येण्यासाठी बंद.

### पर्यायी मार्ग

१. बर्की चौकाकडून जुनामोंढयाकडे येणारी वाहतुक बर्की चौक ते केळी मार्केट चौक वाटमारी रोडने बाफनाचौक कडे जाण्या-येण्यासाठी वापर करतील.

२. वजिराबाद चौकाकडून श्रीनगर, वर्कशॉपकडे जाणारी वाहतुक वजिराबाद चौक, पोलीस मुख्यालय कॉर्नर, लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर (पिवळी गीरणी) ते गणेशनगर वाय पॉईटकडे जाण्या-येण्यासाठी वापर करतील.

३. राजकॉर्नर ते जुनामोंढा मार्गावरील वाहतुक राजकॉर्नर, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर, आनंदनगर, नागार्जुना टी पॉईन्ट, अण्णाभाऊ साठे चौक, यात्रीनिवास पोलीस चौकी, अबचलनगर ते पुढे जाण्या-येण्यास वापर करतील.

४. गोवर्धन घाट पुलावरुन नांदेड शहरात येणारी वाहतुक पोलीस मुख्यालय कॉर्नर, लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर (पिवळी गीरणी) ते गणेशनगर वाय पॉईटकडे जाण्यासाठी वापर करतील.

५. सिडको/हडकोकडून येणारी वाहतुक साईकमान, गोवर्धनघाट नविन पुल, तिरंगा चौक पोलीस मुख्यालय कॉर्नर, लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर (पिवळी गीरणी) ते गणेशनगर वाय पॉईटकडे जाण्यासाठी वापर करतील.

तरी सर्व मोटार वाहन चालक/मालक जनतेनी वरील मार्गाचा वापर करावा व नांदेड पोलीस शहर वाहतुक शाखेस सहकार्य करावे.

**(गणेश माणिकराव सोंडारे)**
पोलीस निरीक्षक,
शहर वाहतुक शाखा, नांदेड